RNI No. MAHBIL/2009/35827

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ७, अंक २] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १४-२०, २०२१/पौष २४-३०, शके १९४२ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

## प्राधिकृत प्रकाशन

### संकीर्ण सूचना व जाहिराती

**जिल्हा परिषद, लातूर**

**वार्षिक प्रशासन अहवाल सन २०१९-२०**

क्रमांक २०/जिपला/साप्रवि/वाप्रअ/का-४/सीआर-११३/काvि-३२८

**अधिसूचना**

लातूर जिल्हा परिषदेच्या सन २०१९-२० या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम १४२(४) व कलम २७४ (२) आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (वार्षिक प्रशासन अहवाल सुधारणा व प्रसिद्धी) अधिनियम, १९६४ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. वाप्रअ-२०१८/प्र.क्र. ५६/परा. ५, दिनांक १४ ऑगस्ट २०१८ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार लातूर जिल्हा परिषदेच्या सन २०१९-२० या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवालास जिल्हा परिषद, लातूरच्या सर्वसाधारण सभा **दिनांक १० नोव्हेंबर २०२० मधील ठराव क्र. ३४४६** अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर अहवालाची अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येत आहे.

लातूर,
दिनांक ३० डिसेंबर २०२०.

**अभिनव गोयल** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

## परभणी जिल्हा परिषद, परभणी

क्रमांक जिप.साप्रवि.परिषद.कावि/५२६/२०

## अधिसूचना

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १४२ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध करणे) नियम १९६६ व १९८१ ला अधीन राहून परभणी जिल्हा परिषदेचा तिच्या कामकाजाचा वार्षिक प्रशासन अहवाल सन २०१९-२०२० तयार केला असून सदरील अहवालास जिल्हा परिषदेच्या **दिनांक १९ नोव्हेंबर २०२०** रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक (५४३) अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

याद्वारे, परभणी जिल्हा परिषदेचा सन २०१९-२०२० चा वार्षिक प्रशासन अहवाल मान्य झाल्याची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**पृथ्वीराज बी. पी.** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी.

परभणी,
दिनांक ८ डिसेंबर २०२०.

**Sr. No. M-2055**

*NOTICE*

**THE TATA POWER COMPANY LIMITED**

REGD. OFFICE : BOMBAY HOUSE, 24 HOMI MODI STREET, MUMBAI - 400 001

Notice is hereby given that the certificate for the under mentioned securities of the Company has been lost/mislaid and the holder of the said securities/applicant has applied to the Company to issue duplicate certificate.

Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered office within 15 days from this date, else the Company will proceed to issue duplicate certificate without further intimation.

| Name of the Holder | Kind of Securities and Face Value | No. of Securities | Distinctive Nos. |
|---|---|---|---|
| Rajinder Kumar Manchanda (Decd) | Equity shares of Re.1/- each | 2160 | 18412311—18414470 |

Place: Delhi,

Date: 30th December 2020. ROMIT MANCHANDA.

**पाचोरा नगरपरिषद कार्यालय, पाचोरा**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये अधिसूचना**

क्रमांक बांध/२८९४/सन २०२०.— पाचोरा शहराची दुसरी सुधारित + वाढीव हद्दीची विकास योजना, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, निर्णय क्रमांक टिपीएस-३५१०/२७७२/प्र.क्रं.१८६/२०११/नवि-९, दिनांक ०३ एप्रिल २०१२ अन्वये भागशः तसेच निर्णय क्रमांक टिपीएस-३५१२/३०१(न)/प्र.क्रं.३२(ब)/२०१३/नवि-९, दिनांक २० फेब्रुवारी २०१५ अंतिम मान्यता मिळाली असून सदर भागशः मंजूर विकास योजना दिनांक १५ मे २०१२ पासून अंमलात आलेली आहे.

नगरपरिषद सर्वसाधारण ई-सभा ठराव क्रं. २६ दिनांक २८ ऑगस्ट २०२० अन्वये सदर मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये खालीलप्रमाणे किरकोळ बदल करणेचे ठरविले आहे.

पाचोरा शहराच्या दुसरी सुधारित + वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील सर्व्हे नंबर २२७ पैकी, २२८ पैकी व २२९ पैकी (गट नं. १६४ पैकी, १६५ पैकी, २० पैकी) मधील खाजगी मालकीच्या क्षेत्र ० हे. ८२ आर जमिनीवर आरक्षण क्रं. २१ नुसार " व्हेजीटेबल मार्केट, शॉपिंग सेंटर ॲण्ड पार्किंग " वापरासाठीचे प्रस्तावित आरक्षण वगळून सदर जमिनीचा वापर रहिवास प्रयोजनासाठी करण्याचा इरादा आहे.

नगरपरिषदेने प्रस्तावित केलेला बदल दर्शविणारा नकाशा मा. अध्यक्षांचे सही, शिक्क्यानिशी व दिनांकासहीत नगरपरिषद कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ ठेवणेत आला आहे. त्याबाबत कोणास सूचना अथवा आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी ही नोटीस **महाराष्ट्र शासन राजपत्र** तसेच स्थानिक व जिल्हा पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत निम्नस्वाक्षरीकार यांचेकडेस लेखी पाठवाव्यात. वरिल मुदतीमध्ये आलेल्या हरकती व सूचनांचा विचार प्रस्तावित बदल महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यापूर्वी नगरपरिषदेमार्फत करण्यात येईल.

पाचोरा नगरपरिषद, कार्यालय,
पाचोरा, जि. जळगाव,
दिनांक ४ डिसेंबर २०२०.

**श्रीमती शोभा बाविस्कर,**
मुख्याधिकारी,
पाचोरा नगरपरिषद, पाचोरा.

**संजय नाथालाल गोहिल,**
अध्यक्ष,
पाचोरा नगरपरिषद, पाचोरा.

**पाचोरा नगरपरिषद कार्यालय, पाचोरा**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये अधिसूचना**

क्रमांक बांध/२८९५/सन २०२०.—पाचोरा शहराची दुसरी सुधारित + वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, निर्णय क्रमांक टिपीएस-३५१०/२७७२/प्र. क्र. १८६/२०११/नवि-९, दिनांक ३ एप्रिल २०१२ अन्वये भागशः तसेच निर्णय क्रमांक टिपीएस-३५१२/३०१(न)/प्र. क्र. ३२(ब)/२०१३/नवि-९, दिनांक २० फेब्रुवारी २०१५ अंतिम मान्यता मिळाली असून सदर भागशः मंजूर विकास योजना दिनांक १५ मे २०१२ पासून अंमलात आलेली आहे.

नगरपरिषद सर्वसाधारण ई-सभा ठराव क्र. ३८, दिनांक २८ ऑगस्ट २०२० अन्वये सदर मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये खालीलप्रमाणे किरकोळ बदल करणेचे ठरविले आहे.

पाचोरा शहराच्या दुसरी सुधारित + वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील सर्व्हे नंबर ४४ पैकी, (गट नं.१००) मधील खाजगी मालकीच्या क्षेत्र ० हे. २७ आर जमिनीवर आरक्षण क्र. ४९ नुसार “ प्ले ग्राऊंड ” वापरासाठीचे तसेच क्षेत्र ० हे. ४७ आर जमिनीवर आरक्षण क्र. ५० नुसार “ प्रायमरी स्कुल ॲण्ड प्ले ग्राऊंड ” वापरासाठीचे अशी दोन्ही प्रस्तावित आरक्षण वगळून सदर जमिनीचा वापर रहिवास प्रयोजनासाठी करण्याचा इरादा आहे.

नगरपरिषदेने प्रस्तावित केलेला बदल दर्शविणारा नकाशा म.अध्यक्षांचे सही, शिक्क्यानिशी व दिनांक सहीत नगरपरिषद कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ ठेवणेत आला आहे. त्याबाबत कोणास सूचना अथवा आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी ही नोटीस **महाराष्ट्र शासन राजपत्र** तसेच स्थानिक व जिल्हा पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे लेखी पाठवाव्यात. वरील मुदतीमध्ये आलेल्या हरकती व सूचनांचा विचार प्रस्तावित बदल महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यापूर्वी नगरपरिषदेमार्फत करण्यात येईल.

पाचोरा नगरपरिषद कार्यालय,
पाचोरा, जि. जळगाव.
दिनांक ४ नोव्हेंबर २०२०.

**श्रीमती शोभा बाविस्कर,**
मुख्याधिकारी,
पाचोरा नगरपरिषद, पाचोरा.

**संजय नाथालाल गोहिल,**
अध्यक्ष,
पाचोरा नगरपरिषद, पाचोरा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.